**महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,**
**महाराष्ट्र राज्य**
**नमुना "अ"**
**(नियम ५ (२) पाहा)**
**निवडणूकीची सूचना**
**महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई याकरिता निवडणूक**

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद (निवडणूक) नियम, १९९१ च्या नियम ५ च्या तरतूदींना अनुलक्षून याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की,

१) महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबईच्या सहा सदस्यांच्या निवडीसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे.

२) पदे भरण्यासाठी पात्र होमिओपॅथिक व्यावसायिकांचे खालीलप्रमाणे नामनिर्देशन अर्ज मागविले आहेत.

अ) नोंदणीकृत व्यावसायिकांमधून **तीन** पदांसाठी

ब) मान्यताप्राप्त संस्थेचे प्राचार्य किंवा संस्था प्रमुखमधून **एका** पदासाठी

क) "मान्यताप्राप्त" परिसंस्थांच्या (प्राचार्य किंवा प्रमुख याहून अन्य) शिक्षकांमधून **दोन** पदांसाठी"

३) यासंबंधात केलेल्या अर्जावरुन, नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्याकडून दि. २७ ऑगस्ट २०१५ पासून दि. ५ सप्टेंबर २०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत मिळविता येतील.

४)नामनिर्देशनपत्रे निर्वाचन अधिकाऱ्याकडे दि. ५ सप्टेंबर २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा प्रकारे परत पाठविता येतील.

५) नामनिर्देशन पत्राची छाननी पोदार आयुवेर्दिक वैद्यकीय महाविद्यालय, वरळी, मुंबई या ठिकाणी दि. ७ सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात येईल.

६) उमेदवारी मागे घेण्याची सूचना, निर्वाचन अधिकाऱ्याकडे दि. ८ सप्टेंबर २०१५ रोजी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचेल अशा प्रकारे पाठविता येईल.

७) उमेदवारांची अंतिम मतदार यादी दि. ९ सप्टेंबर २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

८) निवडणूका घेण्याकरिता खालीलप्रमाणे मतपत्रिका पाठविण्यात येतील.

अ) मतपत्रिका मतदारांकडे दि. २८ सप्टेंबर २०१५ पर्यंत रजिस्टर्ड/स्पीड पोस्टाने पाठविण्यात येतील.

ब) मतदारांनी मतपत्रिका निर्वाचन अधिकाऱ्याकडे दि. १८ ऑक्टोंबर २०१५ रोजी ५.०० वाजेपर्यंत रजिस्टर्ड/स्पीड पोस्टाने पोहोचतील अशा प्रकारे पाठवाव्यात (टपालाने किंवा स्वहस्ते)

क) मतपत्रिकांची छाननी दि. १९ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येईल.

ड) मतपत्रिकांची मतमोजणी दि. २१ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून करण्यात येईल.

(दि.सा.भुयार)
निर्वाचन अधिकारी व प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई १

दि.- २७ जुलै २०१५

पत्ता - श्री. दि. सा. भुयार,
निर्वाचन अधिकारी तथा प्रबंधक, महोप, मुंबई
द्वारा- रा. आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.)
विद्यार्थी वसतीगृह, तळमजला
अध्यापक उपहारगृह कक्षाच्या बाजूची खोली
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई १८
दूरध्वनी क्र. ०२२-२४९३४२१४

टिप - या निवडणूकीसंबंधी सर्व कार्यक्रम व अधिसूचना **www.mchmumbai.org** या वेबसाईटवर उपलब्ध असून **reomch@gmail.com & mail@mchmumbai.org** या ई-मेलवर संपर्क साधावा.